# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Savitribai Phule Pune University**

(Formerly University of Pune)

छाननी व तालिनीकरण कक्ष
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
दूरध्वनी क्र.: २०२५६२१३८४
Website:www.unipune.ac.in

Scrutiny & Tabulation Section
Ganeshkhind,Pune-411007
Phone: 2025621384
E-mail: dyrst@pun.unipune.ac.in


संदर्भ : परीक्षा/एसॲण्डटी/ २२११ दिनांक : १३/१०/२०२१

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्न कला महाविद्यालये

विषय : — बी.ए./बी. कॉम./एम. कॉम./ बी.बी.ए., बी.सी.ए., बी.बी.ए.(आय.बी.) या परीक्षांचे ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२० सत्रातील गुणपत्रके व पासिंग सर्टिफिकेट वितरणाबाबत...

महोदय/महोदया,

ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२० या सत्रातील वरील परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत. सदर परीक्षेची गुणपत्रके व पासिंग सर्टिफीकेट खालीलप्रमाणे वितरीत करण्यात येत आहेत.

१. पुणे शहरातील व पुणे जिल्ह्यातील महाविद्यालयांनी बुधवार दिनांक १४/१०/२०२१ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत परीक्षा विभागातून गुणपत्रके घेवून जावयाची आहेत.
२. नाशिक जिल्ह्यातील महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके संबंधित विद्यापीठ उपकेंद्रातून गुरूवार दिनांक २१/१०/२०२१ रोजी दुपारी २ ते सायंकाळी ६ या वेळेत घेवून जावयाची आहेत.
३. अहमदनगर जिल्ह्यातील महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके संबंधित विद्यापीठ उपकेंद्रातून गुरूवार दिनांक २१/१०/२०२१ रोजी दुपारी १२ ते सायंकाळी ६ या वेळेत घेवून जावयाची आहेत.

आपल्या महाविद्यालयामार्फत उपरोक्त परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके संबंधित विद्यार्थ्यांना देण्याची व्यवस्था करावी. त्याचप्रमाणे एखाद्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रकाबाबत काही शंका असल्यास विद्यार्थ्यांना परस्पर विद्यापीठात न पाठविता महाविद्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत अशी प्रकरणे तातडीने विद्यापीठाच्या परीक्षा विभागात एकत्रित आणून द्यावीत. त्यानंतर त्यातील तांत्रिकता तपासून त्याबाबतची कार्यवाही करता येईल.

आपणांस विनंती करण्यात येते की, उपरोक्त नमुद केल्यानुसार आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा निकाल वेळेत घेवून जाण्याची व वितरण करण्याची व्यवस्था करावी.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
(छाननी व तालिनीकरण कक्ष)

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी —**

१.विद्यापीठ उपकेंद्र प्रमुख, नाशिक/अहमदनगर यांनी सदर निकाल संबंधित महाविद्यालयांना वितरीत करावेत.